# प्रेसनोट

दिनांक २७/०२/२०२५

**तहसिलदार पोलादपुर, जि.रायगड यांनी लाच मागितल्याने लाचलुचपत प्रतिबंध रायगड विभागाने केली कारवाई**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंध विभाग/घटक | रायगड. |
| ठाणे दैनंदिनी नोंद कमांक | पोलादपूर पोलीस ठाणे, कॉ.गु.र.नं. १०/२०२५, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७ |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | कपिल तुकाराम घोरपडे, वय–३९ वर्षे, तहसिलदार पोलादपुर, जि.रागयड (वर्ग–१) |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | ३,००,०००/– रूपये तडजोडी अंती २,५०,०००/– रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | निरंक |
| थोडक्यात हकिगत | यांतील तक्रारदार यांना अखत्यारपत्र दिलेल्या इसमाचे मौजे पार्टेकोंड ता.पोलादपुर, जि. रायगड येथे जमीन असून सदर जमिनीचे तफावतीबाबत तहसिल कार्यालय, पोलादपूर येथे दावा दाखल केला होता. सदर दाव्याचा निर्णय देवून आदेशाची प्रत देण्याकरीता दिनांक ३१/०१/२०२५ रोजी तक्रारदार यांचेकडे आरोपी लोकसेवक कपिल तुकाराम घोरपडे, तहसिलदार पोलादपुर यांनी ३,००,०००/– रूपये लाचेच्या रकमेची मागणी केल्याची तक्रार दिनांक ०३/०२/२०२५ रोजी प्राप्त झाली होती.<br>तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०४/०२/२०२५ रोजी करण्यांत आलेल्या पडताळणीच्या दरम्यान आरोपी लोकसेवक कपिल तुकाराम घोरपडे, तहसिलदार पोलादपुर यांनी तक्रारदार यांच्याकडे जमिनीची तफावतीबाबत दाखल केलेल्या दाव्याच्या आदेशाकरीता रक्कम रूपये ३,००,०००/– ची मागणी करून तडजोडी अंती रक्कम रूपये २,५०,०००/– मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>दिनांक ०५/०२/२०२५ रोजी व दिनांक १८/०२/२०२५ रोजी आरोपी लोकसेवक श्री. कपिल तुकाराम घोरपडे, तहसिलदार पोलादपुर यांचेविरूध्द सापळा आयोजित करण्यांत आला होता. परंतू त्यांना संशय आल्याने त्यांनी लाचेची रक्कम स्विकारली नाही. सबब, आरोपी लोकसेवक कपिल तुकाराम घोरपडे, तहसिलदार पोलादपुर, जिल्हा रायगड यांचेविरूध्द लाच मागणीचा गुन्हा दाखल करण्यांत आला आहे. |
| मार्गदर्शक अधिकारी | १) मा.श्री.शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे परिक्षेत्र ठाणे<br>२) मा.श्री.संजय गोविलकर, अपर पोलीस अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे परिक्षेत्र ठाणे<br>३) मा.श्री.सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे परिक्षेत्र ठाणे |
| कारवाई पथक | १) श्री. शशिकांत पाडावे, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, रायगड.<br>२) श्री.निशांत धनवडे, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, रायगड<br>३) श्री.संतोष भिसे, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, रायगड<br>४) सहा.फौ./विनोद जाधव, ५) सहा.फौ./अरूण करकरे ६) पोहवा/२१८० महेश पाटील<br>७) पोहवा/२२७१ सचिन आटपाडकर ८) चापोहवा/१३२१ सागर पाटील |

**लाचलूचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना अवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती अगर लाच मागणा–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क करावा.**

**संपर्क पत्ता** :– ला.प्र.वि.ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर ठाणे (प) ४०० ०६१.
**संकेतस्थळ** :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
**ई–मेल** :– spacbthane@mahapolice.gov.in
**ऑनलाईनतक्रारॲप्लीकेशन** :– acbmaharashtra.net
**टोल फ्री कमांक** :– १०६४
**दुरध्वनी कमांक** :– ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
**व्हॉट्सॲप कमांक** :– ९९३०९९७७००
**ॲन्टी करप्शन ब्युरो, रायगड अलिबाग कार्यालय दुरध्वनी कमांक ०२१४१ – २२२३३१**
**टोल फ्री कमांक** :– १०६४
**मोबाईल क.** :– ९८७०३३२२९१ ( शशीकांत पाडावे ),
८१०८३५५४८८ ( निशांत धनवडे),
८६५२०९००७८( संतोष भिसे )
**ईमेलआयडी** :–dyspacbraigad@gmail.com

**(शशीकांत पाडावे)**
**पोलीस उप अधीक्षक,**
**ॲन्टी करप्शन ब्युरो, रायगड–अलिबाग**

Scanned with OKEN Scanner